व्यवस्थापन परिषदेची मान्यता • विद्यापीठ स्किल बेस कोर्समधील ५० टक्के शुल्क शिष्यवृत्तीसाठी देणार

# विद्यार्थ्यांना आता अकाउंटिंग, डिजिटल आर्ट्ससह ६७ कौशल्यावर आधारित कोर्स शिकता येणार

प्रतिनिधी | जळगाव

विद्यापीठाने एमकेसीएलसोबत करार केला असून, या करारांतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित (स्किलबेस) ६७ कोर्स शिकायला मिळणार आहे. यात अकाउंटिंग करिअर, बँक ऑफिस करिअर, डिझायनिंग, डिजिटल आर्ट्स, डिजिटल फ्री लान्स, हार्डवेअर व नेटवर्क मॅनेजमेंट, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आदी रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश असून, विशेष म्हणजे या कोर्सच्या शुल्कातून एमकेसीएलला शुल्क दिल्यानंतर जे शुल्क शिल्लक राहील त्यातून ५० टक्के शुल्क हे विद्यार्थ्यांना कुलगुरू कौशल्य विकास शिष्यवृत्ती- नावाने दिले जाणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध विषयांना मान्यता देण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एमकेसीएल सोबत विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे ६० तासांचे २ क्रेडिट असलेले आणि १२० तासांचे ४ क्रेडिट असलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. एकूण ६७ कोर्सेस यामध्ये उपलब्ध आहेत. काही कोर्सेसचे शुल्क ५ हजार रुपये आहे. तर काहींचे अडीच हजार रुपये शुल्क आहे. बैठकीत विद्यार्थी हिताच्या निर्णयांना मान्यता देण्यात आली तर खासगी जागेच्या भूसंपादनाच्या प्रस्तावाला स्थगिती देण्यात आली आहे. बैठकीला प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. एस. टी. भुकन, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, नंदकुमार बेंडाळे, भरत गावित, अॅड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. संतोष चव्हाण व इतर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षा केंद्रांसह मियावाकी घनवनांच्या प्रस्तावाला मान्यता

- विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी व मार्गदर्शन प्राप्त व्हावे यासाठी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे 'कवयित्री बहिणाबाई चौधरी स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्स' हा ऑनलाइन मोडमध्ये सुरू करण्याच्या महत्त्वाच्या निर्णयाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे.
- विद्यापीठाने लोकसहभागातून जळगाव, धुळे व नंदुरबार या तीनही जिल्ह्यात ७५ महत्त्वाकांक्षी मियावाकी घनवनांची निर्मिती टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय घेतला आहे. महाविद्यालय स्तरावर निसर्ग संवर्धन मंडळ तयार केले जावे. रासेयोचे स्वयंसेवक आणि या मंडळाचे सदस्य वनांच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतील.
- समितीत स्थानिक गावकरी, वनविभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, लोकप्रतिनिधी, इतर सामाजिक संस्था यांच्या मदतीने हा प्रकल्प साकारण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील. त्यासंदर्भात नियमावली करण्यासाठी या बैठकीत समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता कार्य सुरू होणार आहे.
- विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या वतीने विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी या शैक्षणिक वर्षापासून मनकौशल्य ही नवी योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेत संभाषण कौशल्य, नेतृत्व कौशल्य, सामाजिक प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, ताण व वेळेचे व्यवस्थापन, विवाहपूर्व समुपदेशन आदींवर मार्गदर्शन केले जाणार आहे.



## नाट्यशास्त्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला सुरुवात

- विद्यापीठात एम.ए. नाट्यशास्त्र हा अभ्यासक्रम सुरू होत असून त्याच्या नियमावली व प्रवेश शुल्काला मान्यता देण्यात आली.
- विद्यापीठातील विविध प्रशासकीय व शैक्षणिक विभागांच्या संरचनेत व कार्यपध्दतीत बदल करण्याबाबत प्रा. माहुलीकरांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या अहवालाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.
- विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ स्तरावर लोकपाल नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या असून त्या अनुषंगाने लोकपाल नियुक्तीच्या प्रस्तावाला तत्त्वत: मान्यता दिली.

## शिक्षक-पालक सभेत जेईई, नीटवर मार्गदर्शन



महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. आर. बी. वाघुळदे.

प्रतिनिधी | जळगाव

धनाजी नाना चौधरी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक- पालक सभा नुकतीच झाली. पालकांनी विचारलेल्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. बी. वाघुळदे हे होते. अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना नीट, जेईई, सीईटी तसेच स्पर्धा परीक्षांबद्दल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे कास्ट सर्टिफिकेट व्हॅलिडिटी याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे उत्तरे देऊन त्यांचे समाधान करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. रेखा भोळे यांनी केले. प्रा. वासंती ढाके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. योगिता भंगाळे यांनी आभार मानले.